# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.04.2025** **वारःमंगळवार**

---

- महाराष्ट्रातील 9 मान्यवर पद्म पुरस्कारानं सन्मानित,

- १५ ऑगस्टपर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना,

- पुणे विमानतळावर मिळणार २० रुपयात वडापाव,

- पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी 'महाराष्ट्र पर्यटन संरक्षण दल' स्थापण्याचा निर्णय,

-आशियाई योगासन स्पर्धेत पुण्याच्या गार्गी भटची सुवर्ण कामगिरी आणि

-विदर्भासाठी पुढील चार दिवस जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा.

**पद्म**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल राष्ट्रपती भवन इथं आयोजित करण्यात आलेल्या समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. यामध्ये ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर आणि गझल गायक पंकज उधास यांना ‘पद्मभूषण पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. पंकज उधास यांच्या पत्नीनं हा पुरस्कार स्वीकारला. मारुती चितमपल्ली यांना  वन्यजीव अभ्यासक, साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील तर चैत्राम पवार यांना पर्यावरण आणि वनसंवर्धन, सामाजिक क्षेत्रातील कामासाठी पद्मश्री पुरस्कार देण्यात आला.

अरुंधती भट्टाचार्य,  पवनकुमार गोयंका  व्यापार आणि उद्योग क्षेत्र, तर जस्पिंदर नरुला, रोणू मजुमदार, वासुदेव कामत यांना कला क्षेत्रातील योगदानासाठी पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<u>व्हेवज</u>**

मुंबई येत्या १ मे ते ४ मे दरम्यान वेव्ज अर्थात 'विश्व दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन होणार असल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचं यजमानपद महाराष्ट्र शासनाकडं आहे.

**<u>सेवा</u>**

राज्यात विविध ठिकाणी सेवा हक्क दिनानिमित्त विविध सेवा प्रदान करण्याच्या कार्यक्रमांचं काल आयोजन करण्यात आलं होतं. ५ ऑगस्टपर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यानिमित्त  दिल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची "दशकपूर्ती" आणि "प्रथम सेवा हक्क दिन" निमित्त राज्यस्तरीय  सोहळ्यात ते काल मुंबईत बोलत होते. १५ ऑगस्टपर्यंत आपल्या सेवा ऑनलाईन न करणाऱ्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची सूचनादेखील फडणवीस यांनी केली.

**२०रुवडापाव**

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलमध्ये कालपासून उडान यात्री कॅफे ही अहोरात्र सुविधा केंद्रिय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सुरु करण्यात आली. इथे प्रवाशांना वीस रूपयांत वडापाव, दहा रूपयांत पिण्याच्या पाण्याची बाटली उपलब्ध असेल. विमानतळावर सामान्य प्रवाशांना खाद्य पदार्थ आणि पेयांचे दर परवडणारे असावे या उद्देशानं ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

**पुणेटेकड्या**

पुणे शहरातील जैवविविधता उद्यान राखीव टेकड्यांवर बांधकामाला परवानगी द्यावी का, याचा पुनर्विचार करण्यासाठी निवृत्त प्रशासकीय अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गटाला ग्रीन पुणे मूव्हमेंट या संस्थेनं विरोध दर्शविला आहे. जैवविविधता उद्यानासाठी राखीव क्षेत्राचा निर्णय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये एकमतानं मंजूर झाला होता. जमीनधारकांना भरपाई देण्याची घोषणादेखील करण्यात आली होती. त्यामुळं हा विषय आधीच निश्चित झालेला असताना आता त्यावर कोणताही पुनर्विचार अस्वीकारार्ह असल्याची भूमिका संस्थेच्या वंदना चव्हाण यांनी  मांडली आहे.

**बीज**

पुण्यामध्ये काल बीज महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित बीजमाता राहीबाई पोपेरे यांना सह्याद्री देवराई आणि भारती विद्यापीठ यांच्याद्वारे आयोजित या बीज संमेलनात ज्येष्ठ शास्त्रीय गायक मुकुल शिवपुत्र यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. विषमुक्त अन्न सेवन करण्याचा सल्ला देताना यावेळी राहीबाई पोपेरे म्हणाल्या...

**जकाअधिवेश**

पहलगाम हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारा ठराव जम्मू - काश्मीर विधानसभेनं विशेष अधिवेशनात काल मंजूर केला. हा अतिशय क्रूर, निर्घृण, अमानुष आणि भ्याड हल्ला काश्मीरियतवर, तसंच संविधानाच्या एकता, शांती आणि सलोख्याच्या तत्वांवर झाला असल्याचं या ठरावात नमूद केलं आहे. काश्मीरमधे प्रथमच दहशतवादाला उघड आणि उत्स्फूर्तपणे विरोध होत असल्याचं प्रतिपादन जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केलं.

**पर्यटनमित्र**

पर्यटन क्षेत्राला चालना आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासनानं 'महाराष्ट्र पर्यटन संरक्षण दल अर्थात पर्यटन मित्र' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यटन क्षेत्रातील वाढत्या संधी, नैसर्गिक, सांस्कृतिक विविधतेचा विचार करता या संरक्षण दलाच्या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित पर्यटनाचा अनुभव देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. येत्या १ ते ४ मे दरम्यान महाबळेश्वर महोत्सवात या दलाचा प्रायोगिक तत्वावर आरंभ करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटीं रुपयांची खासगी गुंतवणूक आणि १८ लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**वेतन**

अनुदानित कला महाविद्यालयं तसंच अनुदानित वास्तुविद्या महाविद्यालयांना वेतनाच्या ९० टक्के अनुदान शासन देतं. तर उर्वरित 10 टक्के वेतनासाठीची रक्कम विद्यार्थ्यांच्या शुल्कामधून घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुण्यातील भारतीय कला प्रसारिणी सभेचे सचिव पुष्कराज पाठक यांनी

दाखल केलेल्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयानं अनुकूल निर्णय देत 15 जुलैपर्यंत शुल्क रचना तयार करण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले आहेत.

**<u>गरीबविद्यार्थी</u>**

बुलडाणा जिल्ह्यातील गरीब विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांकरिता मदत करण्यासाठी मिशन झेड सुरू करण्यात आलं आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी गुलाबराव खरात यांच्या संकल्पनेमधून सुरु झालेल्या मिशन झेड अंतर्गत आवश्यक पूरक शैक्षणिक सुविधा आणि मार्गदर्शन मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद सेस फंडातून विशिष्ट रक्कम बाजूला ठेवण्यात येईल. राज्य शासनाच्या 100 दिवसातील कामकाजातील हा नाविन्यपूर्ण उपक्रम असल्याची प्रतिक्रिया खरात यांनी दिली आहे.

**<u>कंपोस्ट</u>**

परभणी जिल्ह्यात कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू, या अभियानाला येत्या 1 मे पासून सुरुवात होत आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीनी या अभियानात सहभाग नोंदविण्याचं आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी केलं आहे.

**<u>नोटा</u>**

पुण्यात, शिवाजीनगर पोलिसांनी बनावट चलनी नोटा तयार करणारी टोळी उघडकीस आणून चारजणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून २८ लाख रुपयांच्या बनावट नोटा आणि साहित्य जप्त

करण्यात आलं. कोटक महिंद्रा बँकेनं यासंदर्भात तक्रार दिल्यावर ही कारवाई करण्यात आली अशी माहिती उपायुक्त संदीप सिंग गिल यांनी ही दिली.

**Intro-गार्गी**

नवी दिल्लीत आयोजित आशियाई योगासन स्पर्धेत पुण्याच्या गार्गी भट हिनं भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करताना दोन सुवर्णपदकं मिळवली. कनिष्ठ गटात आर्टिस्टिक पेअर विभागात अंजली विशणोईच्या साथीत आणि आर्टिस्टिक ग्रुप विभागात तृप्ती डोंगरे, सी.ओवीया, दिपा लोधी आणि अंजली विशणोई यांच्या साथीनं तिनं सुवर्णपदक पटकावलं. आपल्या यशाबद्दल आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना गार्गी म्हणाली . . . . . .

**क्रिकेट**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत 14 वर्षांच्या वैभव सूर्यवंशी या खेळाडूच्या 38 चेंडूतील 101 धावांच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सचा आठ गडी राखून पराभव केला. वैभवने आपल्या या तडाखेबंद खेळीत सात चौकार आणि 11 षटकार लगावले. आय पी एल च्या इतिहासात सर्वात कमी वयात वेगवान शतक झळकवणारा खेळाडू म्हणून त्याची नोंद झालेली आहे. गुजरात टायटनच्या 209 धावांना प्रत्युत्तर देताना राजस्थान रॉयल्सने 25 चेंडू राखत हे आव्हान पार केलं.

**हवामान**

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात सलग दोन दिवस वादळीवाऱ्यासह गारपिट झाल्यानं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे.

गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या काही भागात काल पावसाच्या हलक्या सरी पडल्या. चामोर्शी तालुक्यातील आष्टी इथं मात्र जोरदार सरी पडल्या.

आज मराठवाड्यात उष्ण आणि दमट हवामान राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी आजपासून पुढील चार दिवस जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**